
करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...
साप्ताहिक कमलाभवानी
# संदेश
वर्षे 34 वे
www.saptahiksandesh.com

संस्थापक संपादक
डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक
सौ.उषादेवी बाबूराव हिरडे
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०

रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३४ वे | अंक क्र.२६ | पाने-१२ | दि.१२/७/२०२४ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ४ रू.

आपल्या व्यवसायाची ऑनलाईन जाहिरात करण्यासाठी उपयुक्त ठिकाण
साप्ताहिक संदेश ऑनलाईन न्यूज पोर्टल
9822058106

मजबुती आणि विश्वास एकाच ठिकाणी !
शिवम बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
आयकॉन स्टील व सिमेंट चे अधिकृत विक्रेते
ICON STEEL
आमच्याकडे नामांकित कंपनीचे स्टील, सिमेंट, सनला, पत्रे, चॅनल, पाईप, क्रशसॅन्ड व खडी तसेच बांधकामासाठी लागणारे मटेरियल होलसेल दरात मिळेल !
प्रोप्रा : अमोल ढवळे (९८५०१२५५६१)
पत्ता : बायपास रोड, निलज चौक, संत निरंकारी मंडळ शेजारी, करमाळा.




## विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने राजकर्त्यांच्या हालचालींना वेग

# आ.शिंदे यांचा विकासकामांच्या मंजुरीवर धडाका - माजी आमदार पाटील यांचा गावभेट दौऱ्यावर जोर

करमाळा: आगामी विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने तालुक्यात रोज नव्या-नव्या हकीकती समोर येत आहेत. त्यानुसार जगताप-शिंदे युती टिकणार का..?, भाजपाकडून बागल गटाला संधी मिळणार का..?, राष्ट्रवादी अजित पवार गटाची उमेदवारी विद्यमान आमदार संजयमामा शिंदे यांना मिळाली तर जगताप गट नेमके काय करणार..?, मराठा फॅक्टर मधून प्रा.रामदास झोळ निवडणूक लढवणार का..?, प्राचार्य



अरूण अडसुळ उभे राहणार का..? असे रोज रोज प्रश्न उपस्थित होत असताना विरोधी गटाचे शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसकडून माजी आमदार नारायण पाटील यांनी मात्र प्रचाराचा धडाका उठवला असून त्यांनी गावभेट दौरा चालू करून तालुका पिंजून काढला आहे. तर आमदार संजयमामा शिंदे हे विधानसभेच्या अधिवेशनात व्यस्त असल्याने त्यांनी रस्ते, पाणी, वीज या कामांच्या मंजुरीवर धडाका लावला आहे. तर भाजपा महिला आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्षा रश्मी बागल यांनी अधिवेशन काळात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रकांत पाटील व अन्य भाजप नेत्यांशी चर्चा करून अनेक कामे मार्गी लावण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच बागल गटाचे युवा नेते दिग्विजय बागल यांनी तालुक्यातील मोठ्या गावात गावभेट दौरा करून संवाद सभा आयोजित केल्या (पान ३)

आशिर्वाद

स्व.डॉ.रतनलाल माणिकचंद शहा-जवळेकर

शहा हॉस्पिटल
मेनरोड, करमाळा.,जि.सोलापूर (जवळेकर)

नवीन रूपात..,
नवीन जागेत..,
स्थलांतरीत झालेल्या
'शहा हॉस्पिटल' च्या
यशस्वी वाटचालीस
हार्दिक शुभेच्छा !

उपलब्ध सुविधा
- डी.आर.डिजीटल एक्स-रे
- अल्ट्रा सोनोग्राफी
- कॉम्प्युटराईज्ड लॅबोरेटरी
- सरकारमान्य कुटूंब नियोजन व गर्भपात केंद्र
- सुसज्ज ऑपरेशन थिएटर
- अतिदक्षता विभाग
- हायस्पीड स्पायरल सिटीस्कॅन इन कॅम्पस्
- कलर डॉपलर
- ई.सी.जी.
- सर्जीकल होम
- फिजिओथेरपी
- सी-आर्म
- गॅस्ट्रोस्कोपी


I.C.U. | Multislice CT Scan | Gastroscope | DR Digital X-Ray | C-Arm
Pathology | E.C.G. | Pulse Oxymeter | Colour Doppler Sonography | Ventilator


डॉ.राजेश आर. शहा
एम.बी.बी.एस., डी.सी.एच. (बालरोग तज्ञ)


डॉ.संदेश आर. शहा
एम.एस.(जनरल सर्जन)




शुभेच्छुक
जीवन मेडिकल & जनरल स्टोअर्स
मेनरोड, करमाळा (प्रोप्रा : रविंद्र रमाकांत बरीदे मो.९८८१०६९२७८)

सुखासाठी फार काही करावं लागत नाही, पण थोड तारतम्य आणि थोड नियोजन केले की सुख आणि सुखच...!

## संपादकीय...........................................!

# वजन

'वजन' हा शब्द उच्चारल्याबरोबर आपणांस स्वत:चे वजन किती हेच आठवते. वजन हे वेगवेगळया स्वरूपाचे असते. त्यामुळे व्यक्तीच्या जीवनात वजन ही बाब महत्वाची आहे. व्यवहारातील वजन, सामाजीक वजन व वैयक्तीक किंवा शारिरीक वजन असे वेगवेगळे प्रकार आहेत. माणसाचे सर्व व्यवहार वजनावर चालतात. कोणतीही वस्तू ही वजन करून घेतली जाते व त्यावरच पैसे ठरतात. त्यामुळे काट्याला महत्व आहे. काही लोक काटा मारतात त्यातून व्यक्तीगत थोडेफार हित होत असेलपण जनमाणसात त्यांचे स्थान भ्रष्ट म्हणून घोषीत होते. काटा मारणाऱ्यांचे व्यक्तीगत वजन वाढले तरी समाजातील वजन शुन्य असते. त्यामुळे वजनाबाबत तीन टप्पे महत्वाचे आहेत. व्यावहारीक वस्तूचे वजन बरोबर पाहिजे, सामाजीक वजन वाढले पाहिजे व शारिरीक वजन कमी असले पाहिजे. बहुतेक ठिकाणी याबाबी उलट्या केल्या जातात व त्यामुळे सुख नावाची गोष्ट संबधितांना मिळत नाही.

दररोजचे सरळमार्गी व्यवहार, समोरच्याला समजून घेणारे व्यवहार, सयंम, कष्ट, इतराला मदत व व्यक्तीगत उन्नती झाली की सामाजीक वजन अपोआप वाढते. व्यवहारात सचोटी असली की व्यवसायातील वस्तूचे वजन बरोबर राहते. पुरेसे लक्ष दिलेतर शारिरीक वजन सुस्थितीत राहते अन्यथा ते कधी वाढते हे कोणालाच कळत नाही. एकदा का वजन वाढलेतर ते कमी करणे कठीण असते. जर वजन तसेच वाढत गेलेतर त्यातून हृदयरोग, रक्तदाब, मधुमेह हे आजार बक्षीस म्हणून मिळतात. या आजारानंतरही या वजनाकडे लक्ष दिले नाहीतर मग सर्वात मोठे बक्षीस म्हणजे मृत्यू हे मिळते आणि मग सर्व धडपड शांत होते.

जगण्याचं उद्दीष्ट म्हणजे सुख हे आहे. हसत-खेळत, आनंदानं जगणं म्हणजे सुख मिळल्यात जमा आहे. त्यासाठी गरज आहे आपल्या उत्तम आरोग्याची. हे आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी संतुलीत वजनाची गरज आहे. काही व्यक्तीचे वजन प्रमाणापेक्षा कमी असते तेथे वजन वाढवले पाहिजे व जेथे वजन जास्त आहे तेथे कमी केले पाहिजे. वजन वाढवण्यासाठी योग्य व्यायाम, पुरेसा व वेळच्यावेळी सत्वयुक्त आहार या गोष्टी महत्वाच्या आहेत. कमी वजन थोड्या प्रयत्नाने वाढते. भुक लागण्यासाठी काही गोळ्या आहेत, काही टॉनीक आहेत, त्याचा वापर केला की भुक लागते, जेवण जाते अणि मग सहज वजन वाढते पण वजन कमी करण्यासाठी काय..?

वजन कमी करणे तसे सहज सोपे नाही. त्यासाठी योग्य प्रयत्न केले पाहिजेत. काळजी घेतली पाहिजे व आहारावर लक्ष ठेवले पाहिजे. सर्वात प्रथम वजन कमी करण्यासाठी संबधित व्यक्तीचा निर्धार फार महत्वाचा आहे. त्या व्यक्तीने तसे ठरवले व त्यानुसार कृती केलीतर वजन कमी होऊन आरोग्य चांगले राहू शकते. त्यासाठी सातत्य लागते. बऱ्याचवेळा निर्णय घेतला जातो पण त्यात सातत्य रहात नाही. अनेकवेळा उपाशी राहून वजन कमी केले जाते, पण पुन्हा कालांतराने आहार पुर्वपदावर आला, की घटलेले वजन तर पुन्हा भरून येतेच पण पुर्वीपेक्षा जास्त वजन वाढते. त्यामुळे वजन कमी करण्यासाठी नियमीत व्यायाम, संतुलीत व नियंत्रित आहार या दोन गोष्टी फार महत्वाच्या आहेत. वजन कमी करण्याच्या काही आयुर्वेदिक गोळ्या आहेत. प्रत्येक व्यक्तीचे पित्त वाढले, की त्याला भुक लागते व तो सणकून जेवतो. त्यावर उपाय म्हणून आयुर्वेदीक गोळ्या आहेत. त्या पित्तश्राव कमी करतात व त्यामुळे कमी भुक लागून आहारावर नियंत्रण बसून वजन घटते. काही गोळ्या मेदनाशक असतात. त्याचाही फायदा होतो,पण या गोळ्यापेक्षा आपल्या हातात वजन कमी करण्याचे जे सोपे मार्ग आहेत ते केलेतर नक्कीच फायदा होतो. उपाशी राहून वजन कमी होत नाही. एक वेळ जेवताना दुप्पट खायचे आणि पुन्हा वजन वाढवायचे ही बाब चुकीची आहे. वजन नियंत्रित ठेवण्यासाठी तीन वेळा जेवण घेण्याऐवजी सहा लहान भागात खाणे योग्य ठरेल.

जेवणाबाबत आयुर्वेदात एक श्लोक आहे. 'याम मम्म न भोक्तव्यं, याम युग्म न लंघयेत' चार तासाच्या आत काही खाऊ नये व आठ तासापेक्षा जास्त उपाशी राहू नये. प्रत्येक जेवणाआधी दोन ग्लास पाणी पिले पाहिजे. जास्त पाणी पिल्याने पोट साफ होते व आहार कमी लागतो. सकाळी नाष्टा घ्यावा तो फायदेशीर ठरतो. म्हणून चहा-कॉफी हे पूर्ण वर्ज्य असले पाहिजे. तसेच मांसाहार यामध्ये प्रमाणापेक्षा जास्त कॅलरीज, प्रथिने असतात, विशेष म्हणजे मनुष्याचे शरिरीर हे मांसाहार पचवण्या जोगे बनवले नाही. त्यामुळे मांसाहार पूर्ण बंद केला पाहिजे. भूक लागल्यानंतर जेवताना किती खातो हे बऱ्याचवेळा लक्षात येत नाही. कारण पोट भरल्यानंतर १० ते १५ मिनीटांनी त्यांचा संदेश मेंदूला पोहोचतो. पण तोपर्यंत तर भुकेपेक्षा दुप्पट खाल्ले जाते. म्हणून जेवताना पोटात बऱ्यापैकी आहार गेल्यावर १० ते १५ मिनीटे थांबणे शक्य नसते,त्यामुळे आपला आहार आपणच ठरवून घ्यावा व तसे जेवण करावे. एकदम उपाशी राहून किंवा कॅलरीज कमी करून अशक्त होणे म्हणजे पुन्हा नव्या आजाराला निमंत्रण असते. जेवताना प्रत्येक घास बारीक चावून खावा, विशेष म्हणजे अलीकडे बहुतेकांचे जेवण टि.व्ही.समोर, पुस्तक वाचताना अथवा महत्वाच्या चर्चा करत चालू असते. ही पध्दत तात्काळ थांबवली पाहिजे. जेवण एके जेवण केले पाहिजे. जेवतांना फक्त जेवणावरच लक्ष दिले पाहिजे म्हणजे आपणाला कळते आपण किती खातो. वसवस खाल्लेतर अन्न जास्त खाल्ले जातेच पण ते बारीक न चावल्यामुळे पोटालाही त्रास होतो व जास्त अन्नही चरबी वाढवते. यासाठी जेवणाकडे लक्ष पाहिजे. रात्री थोडंसच खावं, जास्त खावू नये .जेवताना आपण गोड पदार्थ हा सर्वात शेवटी खातो ते चुकीचे आहे. गोड पदार्थ सर्वात प्रथम खाल्ला पाहिजे . त्यामुळे आपल्या आहारावर योग्य परिणाम होतो. कमी आहार खाल्ला जातो. मुळातच जेवणानंतर गोड खाणे हे अशास्त्रीय आहे. जेवल्यानंतर थंड पदार्थ कधीही खावू नयेत., कोल्ड्रींक्स, आईस्क्रीम खाणे तसेच अती थंड पाणी पिणे हे चुकीचे आहे. मुळातच मेद हा थंड पदार्थाने शरिरात चिटकून बसतो तर उष्ण पदार्थाने तो वितळतो. चरबी कमी करावी असे वाटत असेलतर कोणतेही थंड पदार्थ तसेच व्यसन करू नये. फळे खाताना त्याच्या साली व बिया खाल्ल्या पाहिजे. फक्त त्याचा मग्दुम खल्लातर ते चुकीचे आहे. दुध व दुग्ध जन्य पदार्थ दररोज खाणे टाळले पाहिजे. कारण पिष्टमय पदार्थाची शरिराची गरज भागल्यानंतर ते पुन्हा मिळालेतर त्याची चरबी तयार होते. म्हणून म्हणतात दुधाचे दात पडल्यानंतर नियमीत दुधाची गरज नसते. जेवणात ज्युस, कांदा, टमाटे, मुळा, गाजर, काकडी, पत्ताकोबी पाहिजेतच. यात कमी कॅलरीज असतात व जिवसत्वे जास्त असतात. जेवणात ताजी फळं, कडधान्य, हिरव्या भाज्या, मोड आलेले धान्य याला प्राधान्य दिले पाहिजे. जेवणात तळलेले व चटकदार पदार्थ नसावेत.तसेच भात कमी केलेला बरा.जेवण झाल्याबरोबर लगेच झोपू नये, जेवणानंतर येणारी सुस्ती ही झोप नसते. जेवणानंतर शतपावली केलीच पाहिजे अन्यथा वजन वाढते. विशेष म्हणजे रात्री उशीरा झोपू नये. जे लोक उशीरा झोपतात व उशीरा उठतात ते बहुतेक लठ्ठ असतात. दिवसाची वामकुक्षी ही हानीकारक आहे. दिवसा न झोपणे हितकारक आहे. ज्या लोकांची बैठी कामे आहेत त्यांनी संधी येईल ते शारिरीक काम केले पाहिजे . त्याचा फायदा होतो. आहार जास्त असल्याने चरबी वाढते त्यामुळे एकदम आहार कमी करू नये पण क्रमाक्रमाने थोडा -थोडा आहार कमी करावा तरच वजन कमी होऊ शकेल. विशेषत: सकाळी आंघोळ झाल्यानंतर एक ग्लास कोमट पाणी त्यात एक चमचा मध व लिंबू पिळूण घ्यावे त्याचा मोठा फायदा होतो. प्रयोग सुरू केल्यानंतर सुरूवातीला वजन कमी होते, पुढे वजन कमी होत नाही असे वाटते पण निराश होऊन प्रयोग बंद करू नये. व्यायाम करताना एक गोष्ट लक्षात घेण्याजोगी आहे. ती म्हणजे काही व्यायाम भूक वाढवणारे असतात तर काही व्यायाम चरबी हटवतात. त्वचा व मांसधातूच्यामध्ये चरबी पेशी दबा धरून असतात. त्यामुळे मांसपेर्शीना पिळ पडेल असे व्यायाम उपयुक्त ठरतात. या प्रयोगाला प्रारंभ केल्यानंतर वजन नियमीत किमान आठवड्याला केले पाहिजे व ते वजन एकाच काट्यावर केले पाहिजे. त्यामुळे आपली प्रगती आपल्याला कळते.

बॉडीमास इंडेक्स नुसार पाच फुट महिलेचे वजन ४५.५ किलो पाहिजे त्यापेक्षा उंची कमी असेलतर प्रत्येक इंचाला २.७ किलो कमी पाहिजे. पुरूषाच्या बाबतीत हेच प्रमाण वेगळे आहे. पाच फुट उंचीच्या व्यक्तीचे वजन ४८.२ पाहिजे . अर्थातच हे गणीत किती बरोबर आहे व आपण त्यात गणले जातो की नाही ही बाब जरा वेगळी आहे. पण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे, की जर आपणाला खरंच शारिरीक व्याधी नको असतीलतर आहाराकडे लक्ष दिले पाहिजे. आहार ,विहार व योग्य विचार असला की आरोग्य चांगले राहते. आरोग्य चांगले असले, की कोणतीही गोष्ट अवघड वाटत नाही, त्रासदायक वाटत नाही, जगणं कठीण वाटत नाही. यासाठी प्रत्येकांनी स्वत:कडे लक्ष दिले पाहिजे. अर्थातच सांगणे सोपे आहे, पण केलेतर नक्कीच फायद्याचे हे विसरून नका..!

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

पान १ वरून पुढे....

# विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने राजकर्त्यांच्या हालचालींना वेग

आहेत. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी लवकरच तालुक्यातील ओबीसींचा मेळावा आयोजित करून विधानसभेचे रणशिंग फुंकण्याचा इशारा दिला आहे. तर प्रा.रामदास झोळ यांनी वाशिंबे येथे मेळावा घेऊन विधानसभेला उभा राहण्याची तयारी दर्शवली.

जगताप गटाचे नेते व माजी आमदार जयवंतराव जगताप हे नुकतेच काँग्रेस नेते माजी मुख्यमंत्री सुशिलकुमार शिंदे यांना भेटले आहेत. त्यानंतर श्री.जगताप काँग्रेसमध्ये जाण्याच्या जोरदार चर्चा सुरू असतानाच श्री.जगताप यांनी वरीष्ठांचा आदेश आलातर आपण निवडणूक लढवू असे त्यांनी म्हटले आहे. त्यामुळे सत्ताधारी गटाचे नेते आमदार संजयमामा शिंदे व माजी आमदार जयवंतराव जगताप यांच्या युतीला तडा जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

महायुतीमध्ये दिग्गज नेते आहेत. आ.शिंदे, रश्मी बागल, नारायण पाटील, रामदास झोळ, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांच्यासह भाजपाचे जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे विधानसभेसाठी इच्छुक आहेत. लोकसभेपुर्वी माजी आमदार जगताप हे महायुतीकडे होते पण लोकसभा कालावधीत ते महाविकास आघाडीकडे झुकल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. त्यामुळे श्री.जगताप यावेळी आमदार शिंदे सोबत राहणार का..? हा प्रश्न निर्माण झाला आहे. तर श्री.जगताप हे महाविकास आघाडीकडे राहिलेतर माजी



आमदार पाटील यांना समर्थन देणार का..? याचीही उत्सुकता आहे . महायुतीची उमेदवारी संजयमामा शिंदे यांना मिळालीतर बागल नेमके काय करणार किंवा भाजपा नेत्या रश्मी बागल यांना उमेदवारी मिळाली तर आमदार संजयमामा शिंदे हे अपक्ष उभे राहणार की कोणती भुमीका घेणार ? याची सर्वानाच उत्सुकता आहे. सध्या सत्ताधारी गटात उमेदवारीचा घोळ बराच काळ राहणार आहे. अशा स्थितीत माजी आमदार नारायण पाटील यांनी मात्र गावभेट दौरा करून वातवरण निर्मिती केली आहे. या सर्व गडबडीत नवे चेहरे प्रा.रामदास झोळ, प्राचार्य अरूण अडसुळ , भाजपाचे नेते गणेश चिवटे, बारामती अॅग्रोचे उपाध्यक्ष सुभाष गुळवे हे नेमके काय करणार ?याकडे तालुक्याचे लक्ष वेधले आहे. लवकरच या गटांच्या हालचालीतून तालुक्याच्या राजकारणाची दिशा स्पष्ट होईल, त्यासाठी भविष्यकाराची गरज लागणार नाही; असे या गटाच्या कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे.

# विस्तार अधिकारी मिनीनाथ टकले यांची नाळेवस्ती शाळेस भेट

करमाळा(सं.प्र.) : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नाळेवस्ती येथे पंचायत समिती शिक्षण विभाग बीट नं.१ चे विस्तार अधिकारी मिनीनाथ टकले यांनी पीएटी पायाभूत चाचणी निमित्त भेट देवून इ.३ री व ४ थीच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला. शालेय पोषण आहार, शालेय अभिलेखे पाहणी करून समाधान व्यक्त केले. वृक्षारोपण, परसबाग पाहून शुभेच्छा दिल्या. पायाभूत चाचणीबाबत व इतर प्रशासकीय सुचना देवून मार्गदर्शन केले. यावेळी ग्रा.पं.सदस्य शिवाजी नाळे यांचे हस्ते टकले यांचा सत्कार करण्यात आला.



यावेळी मुख्याध्यापक संतोष पोतदार, अनुराधा शिंदे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, ग्रामस्थ व पालक उपस्थित होते.

प्रियंका आय केअर हॉस्पीटल
पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600
उपलब्ध सुविधा... डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
● मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
● जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
● फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
● सुसज्ज ऑपरेशन थिएटर ● नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
● लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
● एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमॅट्री
डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
आदिका मेडिकल, पुणे रोड, करमाळा., जि.सोलापूर

विघ्नहर्ता इंटिरीयर
प्रोप्रा : अभिषेक कमलेश देवी
मो.9028075051
करमाळा शहरातील एकमेव 'लॅमिनेट आणि हार्डवेअर' चे भव्य शोरूम
देवी प्लायवुड अँन्ड हार्डवेअर
● प्लायवुड ● किचनट्रॉली ● वॉलपेपर
● हार्डवेअर ● फेव्हिकॉल ● वुडन फ्लोरिंग ● सनमायका
प्रोप्रा : अभिनव कमलेश देवी 9011524252
पत्ता : मेनरोड, जैन मंदिर जवळ, करमाळा., जि.सोलापूर

# जिल्हास्तरीय धनुर्विद्या स्पर्धेत सह्याद्री अॅकडमीचे यश



करमाळा(सं.प्र.) : इंडियन आर्चरी असो; च्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय धनुर्विद्या स्पर्धेत करमाळा सह्याद्री अॅकडमीचे सर्व स्पर्धकांनी उत्तुंग यश संपादन केले आहे. या स्पर्धेमध्ये सह्याद्री अॅकॅडमी मधील खेळाडूंचे वर्चस्व कायम राहिले आहे. वयोगट १३ मध्ये ओम अमोल नरूटे, करण बाळनाथ सरडे, अथर्व अमोल नरूटे., वयोगट १५ मध्ये रिहान अकबर मुलाणी, जयहिंद नारायण जगताप, यश सतीश बाबर या स्पर्धकांनी धनुर्विद्या स्पर्धेत यश प्राप्त करून या सर्वांची अमरावती येथे होणाऱ्या राज्यस्तरीय धनुर्विद्या स्पर्धेसाठी निवड झाली आहे. सर्व यशस्वी खेळाडूंना सागर सावंत, अकबर मुलाणी यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

डिस्काउंटच्या जमान्यामध्ये भव्य डिस्काउंटसह
फ्रेश मटेरियलची हमी फक्त एव्हरफ्रेश सुपरमार्ट मध्येच !
खालील सर्व ब्रॅन्डेड वस्तूंच्या MRP वर कमीत कमी
10% पासून 51% पर्यंत डिस्काउंट
अंबारी, सुहाना, प्रविण, रामबंधू, नवजीवन हिंग, किसान, काटदरे, चिंग्ज, कुकवेल, सवई मसाले,
पारले, ब्रिटानिया, सनफिस्ट, हलदीराम चितळे, अमुल, लक्ष्मीनारायण, दावत कल्याण भेळ, सफोला,
कोलगेट, पतंजली, पेप्सोडेंट, मेस्वाक, बबुल, विको, मॅक्सफ्रेश, मेडिमिक्स, संतुर, डव्ह, मोती, लिरील
टाटा, सोसायटी, विक्रम, रेड लेबल, सह्याद्री, परिवार, नेस व ब्रु कॉफी, लिपटन ग्रीन टी व ड्रायफ्रुटस्
पॉण्डस पावडर, पॅराशुट, एचयुल, गुडनाईट, हिमालया, डाबर, गोदरेज, सर्व टूथपेस्ट व टूथब्रश
डेटॉल, हारपीक, लॉयजॉल, निरमा, रिन, टाईड, एरियल, व्हील, पितांबरी, विम, लक्स, लाईफबॉय
इंदुलेखा, सेसा, केशकिंग, नवरत्न, लॉरिअल पॅरिस, जस्मीन, व्हॅसलीन, निविया, फॉग, यार्डली, केएस
गाला, मिल्टन, ओरल बी, हगीज व सर्व बेबी प्रोडक्टस्, बेकरी, स्वीटस् व नमकीन, पुजा साहित्य इ.
टीप : डिस्काउंट ऑफर, नियम व अटी समजावून घेण्यासाठी एव्हरफ्रेश सुपरमार्टला भेट द्या !
॥ नावाप्रमाणेच सर्व काही फ्रेश ॥
एव्हरफ्रेश सुपरमार्ट
॥ प्रिमियम क्वॉलिटी ॥ ॥ भरघोस डिस्काउंट ॥
*नियम व अटी लागू
किराणा । मसाले । प्रिमियम ड्रायफ्रुटस् । बिस्कीटस् । नमकीन अॅन्ड स्वीटस् । बेकरी अॅन्ड मिल्क प्रॉडक्टस् । । नॅचरल प्रॉडक्टस् । पर्सनल, होम अॅन्ड बेबी केअर । आयुर्वेदिक वस्तु । पुजेचे साहित्य
पंढरपूर अर्बन बँके समोर, दत्तपेठ, करमाळा. मो.7059293031

## वीजेचा प्रश्न कायमस्वरूपी सोडण्यासाठी
# १३२ के.व्ही. सबस्टेशनसाठी मकाईची जमीन उपलब्ध करून देणार : दिग्विजय बागल



करमाळा(सं.प्र.) : करमाळा तालुक्यातील पश्चिम भागातील वीजेचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्यासाठी या भागात १३२ के.व्ही.सबस्टेशनची उभारणी करणे गरजेचे आहे. यासाठी मकाई सहकारी साखर कारखान्याच्या मालकीची जमीन देण्यात येईल; अशी ग्वाही मकाई कारखान्याचे माजी चेअरमन दिग्विजय बागल यांनी दिली.

कावळवाडी येथे आयोजित कार्यकर्ता मेळाव्यात श्री.बागल बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पोपट शेजाळ हे होते. क

कावळवाडी येथे बागल गटावर प्रेम करणाऱ्या ग्रामस्थांनी कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन केले होते. मोरवड, केम, वांगी नं.३, वीट, वडगाव (उ), केतूर नं.२, वरकटणे येथील मेळाव्यानंतर हा आठवा मेळावा होता. पुढे बोलताना श्री.बागल म्हणाले, की उजनी धरणात पुरेसा पाणीसाठा असतानाही कात्रज, जिंती, कावळवाडी, रामवाडी, भिलारवाडी या भागातील शेतकऱ्यांना दरवर्षी उन्हाळ्यात पिके जगविण्यासाठी संघर्ष करावा लागतो. त्यामुळे या परिसरात उन्हाळ्यात पुरेसा पाणीसाठा राहील, अशा पातळीवर बुडीत बंधारा झाल्यास येथील शेतकऱ्यांना फायदेशीर होणार आहे. याबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेकडे निवेदनाव्दारे मागणी केलेली आहे. पुढील आठवड्यात पाटबंधारे विभागाकडून स्थळ पाहणी करून शासनास अहवाल सादर केला जाणार आहे; असेही श्री.बागल यांनी सांगितले.

यावेळी मकाईचे चेअरमन दिनेश भांडवलकर, ज्येष्ठ नेते व संचालक बाळासाहेब पांढरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती चिंतामणी जगताप, मकाईचे संचालक रामभाऊ हाके, सतीश नीळ, बाजार समितीचे संचालक काशिनाथ काकडे, आजिनाथ खाटमोडे, अजित झांजुर्णे, विलास काटे, दत्ता गायकवाड, रेवणनाथ निकत, गणेश झोळ, दत्तात्रय कनीचे, रामदास कनीचे, दिवेगव्हाणचे हनुमंत पाटील, स्वप्नील गोडगे, रणजित शिंदे, पप्पू गुळवे यांचेसह पंचक्रोशीतील ग्रामस्थ व महिला उपस्थित होते.

> हायमास्ट दिवे, स्ट्रीट लाईट, बसस्थानक शेड, बाकडी, पेव्हर ब्लॉक, समाजमंदिर तसेच शासनाकडून नियमित मिळणारा शासकीय कार्यालये व शाळा वर्गखोल्याचा निधी अशी कामे झाली की विकास झाला अशी विकासाची व्याख्या मागील दहा वर्षातील लोकप्रतिनिधींनी करून ठेवली आहे. औद्योगिक वसाहत, सिंचनाचे प्रश्न, मजबूत रस्ते, लोकसंख्येनूसार प्राथमिक आरोग्य केंद्र निर्मिती, क्रिडा संकुल, शासकीय जलतरण तलाव, नवीन पोलीस ठाणे, जेऊर रेल्वेस्टेशन येथे मालधक्का, केम येथे ग्रामीण रूग्णालय, पारेवाडी येथे महावितरणचा नवीन उपविभाग, डिकसळ परिसरात बुडीत बंधारा, उजनी जलाशयात पुल, रिटेवाडी उपसासिंचन योजना, केम - वडशिवणे उपसासिंचन, पांढरेवाडी उपसासिंचन योजना, सीना-कोळगाव धरणग्रस्तांना पर्यायी जमीन वाटप अशी कामे होणे आवश्यक आहे. या प्रश्न-संदर्भात उपमुख्यमंत्री फडणवीस यांचेकडे वेळ मागितला असून, लवकरच तालुक्यातील प्रश्नासाठी बैठक लावण्याचे आश्वासन दिले आहे.
>
> **...दिग्विजय बागल**

# देवळाली ग्रामपंचायतीच्या वतीने दिंडीतील वारकऱ्यांची सेवा



करमाळा(सं.प्र.) : देवळाली ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच, ग्रा.पं.सदस्य, कर्मचारी व ग्रामविकास अधिकारी यांच्या मार्फत सर्व आरोग्य सेवा, मसाज सेंटर, कटींग, दाढी, इस्त्री, चर्मकार, आरोग्यासाठी गोळ्या व औषधे, झेंडू बाम, सॅनिटायरी पॅड, पाणी वाटप करण्यात आले. तसेच मोफत रूग्णवाहिका, वृक्षारोपण व स्वच्छता, स्नानगृह, शौचालयाची उत्तम सोय करण्यात आली. याकामी शिक्षक, आरोग्यसेविका, अंगणवाडी सेविका व ग्रामस्थ यांचे सहकार्य लाभले.


## श्री गजानन अगरबत्ती

- सुगंधी अगरबत्ती • कापूर
- अत्तर • धूप • भीमसेन कापूर,
- विविध कलरची रांगोळी
- सर्व प्रकारचे लोबन,
- सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य

योग्य दरात मिळेल !





पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)


# सर्वसामान्य जनतेच्या पाठबळावर विधानसभा निवडणूक लढविणार : प्रा.रामदास झोळ



करमाळा(सं.प्र.) : सामाजिक, वैद्यकिय, आर्थिक, सांस्कृतिक क्षेत्रात करमाळा अग्रेसर राहण्यासाठी सर्वसामान्य जनतेच्या पाठबळावर आपण विधानसभा निवडणूक लढविणार; असे प्रतिपादन दत्तकला शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा.रामदास झोळ यांनी केले.

वार्शिंबे चौफुला येथे आयोजित शेतकरी मेळाव्यात प्रा.झोळ बोलत होते. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ मार्गदर्शक अंकुश झोळ हे होते. यावेळी शेतकरी कामगार संघर्ष समितीचे अध्यक्ष दशरथ कांबळे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष रविंद्र गोडगे, गणेश मंगवडे, मराठा महासंघाचे सचिन काळे, सुहास काळे, मकाईचे माजी संचालक हरिभाऊ झिंजाडे, राजुरीचे माजी सरपंच निवृत्ती साखरे, सामाजिक कार्यकर्ते श्रीकांत साखरे, वार्शिंबेचे भानुदास टापरे, आबासाहेब मगर, माजी सरपंच भगवानराव डोंबाळे, राजुरीचे सरपंच राजेंद्र भोसले, सोगावचे सरपंच विनोद सरडे, उंदरगावचे सरपंच युवराज मगर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी करमाळा तालुक्यातील मकाई तसेच इतर साखर कारखान्याचे थकीत ऊस बिल शेतकऱ्यांना मिळवून दिल्याबद्दल कृतज्ञता म्हणून प्रा.रामदास झोळ व त्यांच्या पत्नी माया झोळ यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शेतकरी, कामगार, युवक, सामान्य जनता आणि वंचित घटकांकडून प्रा.झोळ यांना विधानसभा निवडणूकीस अपक्ष उमेदवारी जाहीर केली.

यावेळी बोलताना प्रा.रामदास झोळ म्हणाले, की आपण जर विधानसभा निवडणूक लढा म्हणत असालतर आपल्या आग्रहाखातर यावेळी विधानसभा निवडणूक लढविण्याची माझी तयारी आहे. राजकारण हे चांगल्या माणसांनी करण्याचे काम नाही असे म्हणून समाजातील चांगली सुसंस्कृत अभ्यासू माणसं राजकारणा पासून अलिप्त राहिल्यामुळे त्या भागाचा विकास खुंटतो व परत तीच मासे म्हणतात की चांगल्या माणसाने राजकारणात आले पाहिजे. परंतु बोलून दाखवण्यापेक्षा समाजाच्या कल्याणासाठी चांगल्या माणसांनी पुढे आले पाहिजे तरच खऱ्या अर्थाने विकास होऊन समाजाचे कल्याण होईल. याच भावनेतून आपण करमाळा तालुका विकासाच्या प्रक्रियेपासून वंचित असल्याने या तालुक्याची परिस्थिती पाहता आपला तालुका मागास राहिल्यामुळे या तालुक्याचे भवितव्य धोक्यात आहे. राजकारणी मंडळी केवळ राजकारणापुरतं राजकारण करून आपला वैयक्तीक विकास करण्यात दंग आहेत. गटातटाचे राजकारण करून फक्त जनतेला विकासाचे नुसते खोटे चित्र दाखवून भुल पाडण्याचे काम केले जात आहे. करमाळा तालुक्यामध्ये व्यावसायिक शिक्षणाची कुठलीही सोय नाही. त्यामुळे येणाऱ्या युवा वर्गासमोर दहावी, बारावी, पदवीधर झाल्यानंतर रोजीरोटीसाठी परगावी जाण्याशिवाय पर्याय नाही. करमाळा हा मोठा तालुका असतानाही एकही मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल नाही, आरोग्य सुविधाच्या अभावामुळे नागरीकांचे मोठ्या प्रमाणात हाल होत आहेत. उजनी धरणामुळे येथील शेतकरी काही प्रमाणात ऊसामुळे सधन झाला असलातरी राजकीय हस्तक्षेपामुळे शेतकऱ्यांच्या ऊसाला भाव मिळत नाही, भाव मिळालातर बिल लवकर मिळत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचा वाली कोणी उरला नाही. त्यामुळेच करमाळा तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी भुमिपूत्र या नात्याने तालुक्याच्या समस्या सोडविण्यासाठी आज आपण राजकीय भुमिका घेतली नाहीतर आपला तालुका आणखी मागे जाईल आणि भविष्यामध्ये आपण करमाळा तालुक्यासाठी काही नाही केले, याचा पश्चाताप होईल. अशी भावना मनात निर्माण झाल्याने मी करमाळा तालुक्यासाठी राजकीय भुमिका घेऊन काम करण्याचे ठरवले आहे. सर्वसामान्य जनतेच्या पाठबळावर आपण विधानसभा निवडणूक लढवणार असल्याचे प्रा.झोळ यांनी सांगितले.

यावेळी प्रा.झोळ यांनी रिटेवाडी उपसासिंचन योजनेच्या आंदोलनात सहभागी होऊन त्याचाही पाठपुरावा केला. मराठा समाजासाठी मनोज जरांगे-पाटील यांच्या आरक्षणाच्या आंदोलनाला पाठींबा देत असताना मराठा समाजाच्या विविध अडचणी सोडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. तसेच मराठा समाजाबरोबर इतर ओबीसी आणि वंचित समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती मिळवून देण्यासाठी शासन दरबारी लढा देऊन प्रत्येक वेळी वंचित आणि ओबीसी समाजातील विद्यार्थ्यांना देखील सहकार्य करण्याची भुमिका घेतली. तालुक्यातील विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षण मिळावे; या उद्देशाने करमाळा शहराच्या नजीक देवळाली येथे लवकरच मोठे शैक्षणिक संकुल उभा करण्याचा मानस असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्रीकांत साखर-पाटील यांनी केले तर उपस्थितांचे आभार अनुरथ झोळ यांनी मानले. या मेळाव्यास वार्शिंबे गावासह तालुक्यातील हजारो नागरीक, युवक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महायुतीच्या योजना पदाधिकाऱ्यांनी जनतेपर्यंत पोहचवाव्यात : आ.सुभाष देशमुख



करमाळा(सं.प्र.) : महायुती सरकारच्या जास्तीत जास्त योजना तळागाळापर्यंत पोहचविण्यासाठी भारतीय जनता पार्टीच्या सर्व पदाधिकारी, बुथ प्रमुखांनी प्रयत्न करावे व येणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीकोनातून करमाळा तालुक्यात कार्यकर्त्यांनी कामाला लागावे; असे आवाहन माजी सहकार पणन व वस्त्रोद्योग मंत्री तथा आमदार सुभाष देशमुख यांनी केले आहे.

देवळाली येथे आयोजित भाजपा कार्यकर्ता मेळाव्यात आमदार देशमुख बोलत होते. या मेळाव्याचे आयोजन भाजपाचे जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे यांनी केले. यावेळी आ.देशमुख यांनी भाजपा व महायुती सरकारने आत्तापर्यंत केलेल्या लोकोपयोगी योजना तसेच नुकत्याच झालेल्या अर्थसंकल्प मध्ये जनतेच्या हिताचे घेतलेले निर्णय सांगितले. महायुती सरकारच्या योजना तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी भाजपाच्या सर्व पदाधिकारी, बुथ प्रमुख यांनी जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्न करावेत. तसेच येणाऱ्या विधानसभेच्या दृष्टीकोनातून करमाळा तालुक्यात कार्यकर्त्यांनी कामाला लागावे. तसेच कमळ या चिन्हावर भाजपाचा उमेदवार निवडून येईल या दृष्टीकोनातून काम करावे; असे आवाहन कार्यकर्त्यांना केले.

यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार, मकाईचे माजी चेअरमन दिग्विजय बागल, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे, उमेश मगर इ. ची भाषणे झाली. प्रास्ताविक दिपक चव्हाण व नितीन झिंजाडे यांनी केले. सुत्रसंचालन विनोद महानवर यांनी केले. आभार शहराध्यक्ष जगदीश आगरवाल यांनी मानले. या कार्यक्रमास जिल्हा उपाध्यक्ष पै.अफसर जाधव, तालुका अध्यक्ष रामा ढाणे, काकासो सरडे, शशी कल्याणी, डॉ.अभिजीत मुरुमकर, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष अमोल पवार, शहाजी पाटील, संदिपान कानगुडे, भैय्या गोसावी, नितीन कानगुडे, सचिन कानगुडे, लखन शिंदे, धनंजय चोपडे यांचेसह भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.

खुशखबर मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको नगर-बारामती-सोलापूर खुशखबर
बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)
आता आपल्या करमाळ्यात !
उपलब्ध सुविधा...
• मुळव्याधवर इंजेक्शन • डिलीव्हरीनंतर उद्भवारे कोंब
• एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्भवणारे कोंब
• संडासवाटे रक्त येणे, पु येणे • संडासची जागा बाहेर पडणे
• संडास जागी खाज व आग होणे • संडासाचा नागवेडा
• संडास नंतर बसण्यास त्रास होणे • भगंदर, फिशर
• चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)
ओपीडी /ऑपरेशन ठिकाण
दर गुरूवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
लोकरे हॉस्पिटल
कृष्णाजीनगर, बायपास रोड करमाळा., जि.सोलापूर
(९८५०८५१००५)
परिचय
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई
विशेष सुचना...
१. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल.
२. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे.
३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील.
४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य.
५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.
नाव नोंदणीसाठी संपर्क मो.9763035862
बार्शी धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कोर्ट समोर, बार्शी.

# शिष्यवृत्ती परीक्षेत म.गांधी विद्यालयाचा वेदांत कानडे तालुक्यात प्रथम

करमाळा(सं.प्र.) : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षा २०२४ मध्ये महात्मा गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय करमाळा येथील आठवी मधील विद्यार्थी वेदांत उमेश कानडे याने २५० गुण मिळवून तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवला व जिल्ह्यात शहरी विभागात २८ क्रमांक मिळवून उज्वल यश संपादन केले आहे. तसेच त्याने मंथन प्रज्ञाशोध परीक्षेत तालुक्यात प्रथम क्रमांक, भारतीय अभिरूप शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्ह्यात तिसरा क्रमांक मिळवल्याबद्दल



त्याच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व माजी आमदार जयवंतराव जगताप, माजी नगराध्यक्ष वैभवराजे, शंभुराजे जगताप व इतर शिक्षकांनी केले.

# वांगी नं.१ येथे टीपरचा अपघात - सोपान शेंडगे यांचे निधन



करमाळा(सं.प्र.) : वांगी नं.१ येथे ८ जुलैला रात्री अकरा वाजता टिपर मालक सोपान ज्ञानदेव शेंडगे (वय-२७, रा.केतूर यांचा टिपरचा अपघात होऊन त्यात निधन झाले आहे. यात हकीकत अशी, की केतूर येथील सोपान शेंडगे हे त्यांचा टिपर घेऊन वांगी नं.१ गावातून रात्री अकरा वाजता जात असताना त्यांच्या टिपरची ट्रॉली अचानक वर झाली. त्यावेळी ट्रॉली एलटी व एचटी वीज वाहक तारेला अडकली व त्यात तारा तुटल्या. त्यावेळी सदरचा टीपर व्हायबल होऊन गावातील वेशीला धडकला. त्यानंतर वेशीवरील सिमेंटचा अवजड भाग टीपरच्या केबीन वर पडला. त्यावेळी टीपरचे केबीन दबून सोपान ज्ञानदेव शेंडगे यांचे निधन झाले आहे. त्यांचे मागे आई-वडील, पत्नी, तीन लहान मुले व भाऊ असा परिवार आहे. त्यांच्या अंत्यविधी प्रसंगी सर्व क्षेत्रातील नागरीक उपस्थित होते. सोपान शेंडगे यांच्या आकस्मित निधनाबद्दल केतूर परिसरातून हळहळ व्यक्त केली जात आहे.

करमाळा व परिसरातील त्वचा रूग्णांच्या सेवेसाठी
सोलापूर येथील त्वचारोग तज्ञ
डॉ.संकेत मंडलेचा MBBS, DDV (Pune)
प्रत्येक महिन्याचा दुसरा व चौथा शुक्रवारी सकाळी १० ते दु. २ पर्यंत




त्वचा विकार : नायटा/गजकर्ण, इसब, खरूज, काळे डाग, सोरायसिस, पिंपल्स्, चाई, कोंडा, स्ट्रेचमार्क, केस गळती, जुनाट खाज, ॲलर्जी, अतिरिक्त घाम येणे, वांग, नागिण, कांजण्या,नखांचे आजार, सुरमा इ.आजारांवर खात्रीशीर उपचार व सल्ला
संपर्क : डॉ.सारंगकर डेंटल क्लिनिक
करमाळा-जेऊर रोड, कॉटेज हॉस्पिटल समोर, करमाळा., जि.सोलापूर
अपॉईंटमेंट : मो.9423333904

लक्ष्मीकांत देवी (9421063525, 8805633525)
श्रीजी इस्टेट एजन्सी
पत्ता : मेनरोड, करमाळा.
• घरजागा, दुकान जागा
• प्लॉट व बंगले
• जमीन बिनशेती करणे
• व्यवहार करून दिले जातील
• सरकारी दस्तऐवजची कागदपत्र घरपोहोच केली जातील.

पुनम एजन्सी
अंबुजा सिमेंटचे करमाळा तालुका वितरक
• बिल्डींग मटेरियल सप्लायर्स • प्लंबींग • हार्डवेअर
स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट
होलसेल व रिटेल योग्य दरात मिळेल
प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ता: बायपास रोड, जेऊर.

## टायगर ग्रुप, मनसे व चालक-मालक संघटनेच्या वतीने
# दिंडीतील वारकऱ्यांना उपवासाच्या पदार्थांचे वाटप




करमाळा(सं.प्र.) : संतश्रेष्ठ निवृत्ती महाराज पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांना टायगर ग्रुप, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, चालक-मालक संघटना यांचे वतीने चिक्की, वेफर्स इ. उपवासाचे पदार्थ देऊन अन्नदान करण्यात आले. या उपक्रमाचे पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांनी कौतूक केले. यावेळी टायगर ग्रुपचे अध्यक्ष तानाजी जाधव, मनसेचे जिल्हा उपाध्यक्ष नानासाहेब मोरे, जैन संघटनेचे प्रदीपशेठ बलदोटा, चालक-मालक संघटनेचे सर्व सदस्य उपस्थित होते. या अन्नदानाचा हजारो वारकऱ्यांनी लाभ घेतला.

## शेतकऱ्याची थकीत ऊस बिल व्याजासहीत जमा होण्यासाठी
# तहसील कार्यालय वरील प्रा.झोळ यांचे हलगी आंदोलन यशस्वी



करमाळा(सं.प्र.) : तालुक्यातील साखर कारखान्याचे शेतकऱ्यांची थकीत ऊस बिल १५ टक्के व्याजासहीत जमा करण्यासाठी दत्तकला शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा.रामदास झोळ यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदार यांना निवेदन देऊन हलगीनाद आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. त्याच अनुषंगाने करमाळा तालुक्यातील मकाई, आदिनाथ, भैरवनाथ, कमलाई साखर कारखान्याचे थकीत ऊस बिल एफआरपी प्रमाणे १५ टक्के व्याजासहीत मळण्यासाठी १२ जुलै रोजी करमाळा तहसील कार्यालयासमोर हलगीनाद आंदोलन प्रा.रामदास झोळ यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. या आंदोलनाला खऱ्या अर्थाने यश मिळाले असून कमलाई कारखान्याने शेतकऱ्यांच्या खात्यावर बिल जमा करून उर्वरित साडेतीन कोटी ही जमा करण्याची प्रक्रिया सुरु केली असून तसे प्रशासनाला सुचित केले आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याचे काम प्रा.रामदास झोळ व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले.

करमाळा तालुक्यातील शेतकऱ्यांचे ऊसाचे एफआरपी बिल त्वरीत देण्यात यावे. याबाबतचे निवेदन नायब तहसीलदार यांनी स्विकारले व याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार प्रशासनाने तहसीलदार शिल्पाताई ठोकडे यांनी दिलेल्या आश्वासनानुसार आंदोलन स्थगित करण्यात आले. प्रा.झोळ यांच्या आंदोलनामुळे कमलाई कारखान्याने शेतकऱ्याची ऊस बिल खात्यावर जमा केली असून १५ टक्के उर्वरित साडेतीन कोटी खात्यावर जमा करणार असल्याचे सांगितले. तर मकाई कारखान्याने ऊस बिल जमा केल्याचे पत्र दिले. मात्र १५ टक्के व्याजाची रक्कम जमा करण्याबाबत प्रशासनाला कुठलेही ठोस आश्वासन असे पत्र दिलेले नाही. यावर प्रशासनाने मग मकाई कारखान्याला तशा सूचना करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देणार असल्याचे सुचित केले. भैरवनाथ कारखान्याने ऊस बिल जमा केले असलेतरी १५ टक्के व्याजाची रक्कम देण्याबाबत त्यांनाही सूचना करण्याचे सुचित करण्यात आले आहे. आदिनाथ कारखान्याची ऊस बिल व १५ टक्के रक्कम शिल्लक असल्याने मॉलिसेस विकून बिल देण्याबाबतच्या सूचना प्रशासना मार्फत करण्यात येतील असे आश्वासन दिले. त्यामुळे हलगी आंदोलन यशस्वीपणे संपन्न झाले आहे. यावेळी शेतकरी कामगार संघर्ष समितीचे दशरथ कांबळे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा कार्याध्यक्ष रवी गोडगे, गणेश मंगवडे, सुदर्शन शेळके, बापू फडतरे, पोटेगावचे सरपंच प्रशांत नाईकनवरे, बापू वाडेकर, सुभाष काळे-पाटील, देवळालीचे नाना ननवरे, खडकीचे निलेश शिंदे, तानाजी शिंदे, दिपक शिंदे, निमगावचे नीळ, हिंगणीचे प्रविण तानाजी बाबर, बाबाजान खान तसेच अंजनडोहचे माजी उपसरपंच शहाजी माने, किसन हनपुडे, बबन वीर, अशोक गोडगे, भगवान डोंबाळे, धनाजी जाधव, बापू फरतडे, बापू वाडेकर, राजेश गायकवाड, गणेश बाबर, तात्यासाो सरडे इ.शेतकरी बांधव उपस्थित होते.

# सुशिलकुमार शिंदे -जयवंतराव जगताप यांची भेट
## राजकीय क्षेत्रात चर्चेला उधाण



करमाळा(सं.प्र.) : माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी सोलापूर येथे जनवात्सल्य निवास्थानी माजी केंद्रीय मंत्री व काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशिलकुमार शिंदे यांची भेट घेतली. एकांतात तब्बल अर्धा तास झालेल्या भेटीचा तपशील मात्र गुलदस्त्यातच आहे. चर्चेवेळी खासदार प्रणिती शिंदे उपस्थित होत्या. या भेटीने राजकीय विश्लेषकांच्या भुवया उंचावल्या असून लोकसभेतील विजयाने आत्मविश्वास दुणावलेल्या शिंदे यांनी पक्षवाढीसाठी आपल्या मुळ काँग्रेसी जुन्या सहकाऱ्यांची मोट बांधणे सुरू केल्याचेच हे द्योतक आहे.

शिंदे यांच्या राजकीय जीवनाची सुरूवात झालेल्या करमाळा मतदारसंघातून जयवंतराव जगताप यांना ताकद देत पुन्हा काँग्रेस बळकटीचे त्यांचे धोरण आहे. शिंदे-जगताप यांच्या भेटीने राजकीय विश्लेषकांच्या भुवया उंचावल्या असून माजी आमदार जगताप काँग्रेस तर्फे विधानसभेच्या रिंगणात उतरणार असल्याच्या चर्चेला उधाण आले आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत जगताप यांनी धैर्यशील मोहिते-पाटील यांना समर्थन दिले होते. या निवडणुकीवेळी जगताप यांची शरद पवार व विजयसिंह मोहिते-पाटील यांनी भेट घेतली होती. यावेळी जगताप यांनी त्यांचा यथोचित सत्कार करत जनतेला सूचक संदेश दिला

जगताप यांचे वडील माजी आमदार स्व.नामदेवराव जगताप निष्ठावंत काँग्रेसी होते. पक्ष संघटनेच्या माध्यमातून त्यांची जिल्ह्यावर मजबुत पकड व कार्यकर्त्यांचे संघटीत जाळे होते. जयवंतराव जगताप हे दोन वेळा आमदार, ३० वर्षे बाजार समितीचे सभापती, राज्य बाजार समिती संघाचे संचालक, प्रदीर्घ काळ जिल्हा बँकेचे संचालक व उपाध्यक्ष, आदिनाथ कारखान्याचे चेअरमन पद भुषविले आहे. सहकार व शैक्षणिक क्षेत्रात ते कार्यरत असून तालुक्याच्या राजकीय क्षेत्रात जगताप यांचा प्रभावी व्यक्तीमत्वाचा, वक्तृत्वाचा मोठा दबदबा आहे. निष्ठावंतांची एकगठ्ठा मते हे आजही जगताप गटाचे बलस्थान असून जगताप यांच्या भुमिकेवरच करमाळा विधानसभेचा निकाल अवलंबून आहे.

याविषयी जगताप यांना विचारले असता, त्यांनी ही सदीच्छा भेट असल्याचे सांगितले. तसेच शिंदे व माझे खूप जुने ऋणानुबंद व भावनिक नाते असून स्थानिक राजकीय परिस्थितीमुळे जरी पक्षीय पातळीवर काही वेळा वेगळे निर्णय घेतले गेले असलेतरी माझी त्यांच्यावरील श्रध्दा व त्यांचे माझेवरील प्रेम तसूभरही कमी झाले नाही. भावनिकदृष्ट्या व वैचारीकदृष्ट्या माझी सुशिलकुमार शिंदे, शरद पवार व विजयसिंह मोहिते-पाटील यांच्याशीच नाळ असल्याचे जगताप यांनी सांगितले. काँग्रेसने नुकतेच विधानसभा मतदारसंघातून इच्छुकांचे अर्ज मागवले आहेत. त्यासाठी जगताप यांच्यासारख्या सक्षम उमेदवाराचे नाव पुढे करून जास्तीत जास्त जागा पदरात पाडण्याचा काँग्रेसच्या रणनितीचा देखील हा एक भाग असू शकतो.



करमाळा येथील व्यापारी संतोषशेठ गुगळे यांच्या कन्येच्या विवाहप्रसंगी पुणे येथे एका आनंदाच्या क्षणी माजी आमदार जयवंतराव जगताप हे जुने सहकारी असलेले विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे यांना पेढा भरविताना शेजारी मुस्लिम समाजाचे नेते उस्मानशेठ तांबोळी, माजी नगराध्यक्ष अमोदशेठ संचेती माजी उपनगराध्यक्ष ॲड.कमलाकर वीर, शिवसेना वैद्यकिय मदत कक्षाचे मंगेश चिवटे, रितेश कटारिया व संतोषशेठ गुगळे, निरज गुगळे

तुका म्हणे एक मरणेची सरे ।
उत्तमची उरे किर्ती मागे ॥



दशक्रिया विधी

आमच्या मातु:श्री कै. गं. भा.

सरस्वती नवनाथ करे

यांना वयाच्या ६७ व्या वर्षी आषाढ शुक्ल द्वितीया शके १९४६, रविवार दि. ०७/०७/२०२४ रोजी देवाज्ञा झाली. त्यांचा दशक्रिया विधी मंगळवार दि. १६/०७/२०२४ रोजी सकाळी ठीक ८:०० वाजता भीमा नदी तीर, सिद्धटेक, ता. कर्जत, जि. अहमदनगर येथे होणार आहे.

॥ शोकाकुल ॥

योगिराज नवनाथ करे | सविता रेवणनाथ देवकते | किरण नवनाथ करे

समस्त करे परिवार (विहाळ, ता. करमाळा, जि. सोलापूर )
आप्तेष्ट , नातेवाईक आणि सगेसोयरे

वेळ:- सकाळी ८:०० वाजता

कार्यस्थळ:- भीमा नदी तीर, सिद्धटेक, ता. कर्जत, जि. अहमदनगर



करमाळा येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील **प्रा.अभिमन्यु माने** यांना Linguistic Study of Kaikadi Language in Solapur District या संशोधन विषयावर पी.एचडी (डॉक्टरेट) पदवी प्राप्त झाल्याबद्दल

हार्दिक अभिनंदन

शुभेच्छुक

- ॲड.कमलाकर विश्वनाथ वीर (मा.उपनगराध्यक्ष)
- शहाजी विश्वनाथ वीर
- अरूण(काका) जगताप
- पंकज नानासाहेब वीर
- ॲड.प्रितम नानासाहेब वीर
- ॲड.अक्षय कमलाकर वीर
- वीर व जगताप परिवार, करमाळा.



Right Store Right Price

अधिकृत वितरक

रणजीत कटारिया किराणा

गजराज मसाले | Prabhat Dairy | Orange Aroma | Zoopy | Lay's

सर्व किराणा होलसेल दरात उपलब्ध

मे.रणजीत कटारिया किराणा

किराणा मालाचे व्यापारी व FMCG प्रॉडक्ट चे अधिकृत वितरक © 9610015004 | 9403433131



फ्रेश अँन्ड प्युअर

डेअरी फ्रेश मिल्क

दुध, कुल्फी, लस्सी, श्रीखंड, आम्रखंड,पनीर, ताक, खवा, तुप, क्रीम मिळण्याचे ठिकाण

हॉटेल चिवटे फॅमिली रेस्टॉरंट
संगोबा रोड, श्रीदेवीचामाळ, करमाळा. मो.९८२२५०२७००

चिवटे उपहारगृह राशिनपेठ
करमाळा. मो.८८८८१४७००५



स्पेशल व्हेजसाठी...

आगरवाल फुड हब

शुध्द शाकाहारी जेवणाची उत्तम सोय



जेवण पार्सलची उत्तम सोय

- पंजाबी डिशेस
- चायनीज
- साऊथ इंडियन नाष्टा
- चहा, कोल्ड्रींक्स
- पिझ्झा, बर्गर

संपर्क... 9423326655

पत्ता श्री कमलादेवी रोड, बायपास चौक, करमाळा.

# तांबोळी कुटूंबाकडून दिंड्यांचे स्वागत




करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरामध्ये गेली आठ वर्षापासून जवळपास ६०० किलोमीटर लांबून श्री संत ज्ञानेश्वर सेवा या पालखीचे आगमन होते. विशेष म्हणजे सदर पालखीचे स्वागत उद्योजक तथा माजी नगरसेवक अल्ताफ तांबोळी त्यांचे कुटूंबिय करतात. यातून हिंदू मुस्लिम सामाजिक बांधिलकी दिसून येते. दिंडीचा पाहुणचार करताना तांबोळी कुटूंबिय तसेच समाजातील काही मंडळी सदस्या दिंडीत सहभागी होतात. यावर्षी श्री संत ज्ञानेश्वर सेवा इंदौर या पालखीचे स्वागत मुस्लिम समाजाच्या वतीने करमाळ्यातील औद्योगिक वसाहतीत अल्ताफ तांबोळी, राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष अमीर तांबोळी यांनी केले. महाराष्ट्रातील काही नागरीक व्यापारासाठी मध्यप्रदेशात गेली होती व तेथेच ते स्थायिक झाले. परंतु आजही ते पंढरपूरच्या आषाढी एकादशीला यायचे विसरले नाही. सदरची दिंडी ही इंदौरहून चापडगाव (जि.अ.नगर) येथील अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मभुमी स्थळी येतात व तेथून पायी चालत करमाळ्यात मुस्लिम समाजाचे अध्यक्ष हाजी उस्मानशेठ तांबोळी यांचेकडे त्यांचा पहिला मुक्काम असतो. त्याठिकाणी तांबोळी बंधू सर्व वारकऱ्यांची जेवणाची व राहण्याची व्यवस्था गेली आठ वर्षापासून करत आहेत. तसेच हाजी हाशमोद्दीन तांबोली चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून उस्मानशेठ तांबोळी व अल्ताफ तांबोळी यांनी आजपर्यंत अनेक सामाजिक उपक्रम राबवत राष्ट्रीय एकात्मता जपण्याचा प्रयत्न केला. यामध्ये दिवाळी, गणेश उत्सव, ईद आदी सणामध्ये तांबोळी बंधूचा सहभाग कायम असतो. श्री संत ज्ञानेश्वर सेवा इंदौर या पालखीचे आगमन झाल्यानंतर पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांनी पालखीचे पूजन केले. यावेळी माजी नगरसेवक अल्ताफ तांबोळी, संजय सावंत, शिवसेना शहरप्रमुख प्रविण कटारिया, संजय शिंदे, फारूक जमादार, नितीन घोलप, राजेंद्र घाडगे, तौफिक शेख, वाजीद शेख, मजहर नालबंद यांचेसह जयमहाराष्ट्र मित्र मंडळाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

करमाळा शहरात प्रथम सुरू..!
पाटील
Reg no.42433
डॉ.सौ.अर्चना दिनेश पाटील
( Clinical Cosmetologist & Trichologist )
स्किन, हेअर ॲन्ड जनरल क्लिनिक
उपलब्ध सुविधा
● त्वचा : P.R.P. चिकित्सा, I.P.R.F. चिकित्सा, P.R.P. मायक्रोनीडलिंग, ॲंटी येजिंग थेरपी, मुरूम व मुरूमाचे डाग घालवणे, वांग व व्रण घालवणे, चेहऱ्यावरील सुरकुत्या घालवणे, ब्रायडल फेशियल, मेडी फेशियल, हायड्राफेशियल, स्किन पोलिशिंग, चामखीळ काढणे, मस काढणे, पर्मनंट आयब्रो, पर्मनंट लिप कलर
● केस : P.R.P.चिकित्सा, I.P.R.F.चिकित्सा, I.J.F.C.थेरपी, टक्कल पडणे, केस गळणे, केसातील कोंडा घालवणे, केसांची वाढ खुंटणे, केस पांढरे होणे, चाई पडणे
● सर्व आजारांवर उपचार ● रक्त लघवी तपासणी ● लहान मुलांना वाफ देणे
● सांधेदुखी, कंबरदुखी ● होमिओपॅथिक उपचार
पत्ता : संगोबा रोड, श्रीदेवीचामाळ, करमाळा. मो.9604801573

# छत्रपती शिवाजी तरूण मंडळा तर्फे वारकऱ्यांना चिवडा वाटप



करमाळा(सं.प्र.) : सुनीलबापू सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती शिवाजी तरूण मंडळाच्या वतीने पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकऱ्यांना चिवड वाटप करण्यात आला. यावेळी समाजकल्याण अधिकारी गोपाळबापू सावंत, आर.जी.पाटील, माजी उपनगराध्यक्ष दादासाहेब सावंत आदी मान्यवर उपस्थित होते. छत्रपती शिवाजी तरूण मंडळाच्या वतीने गेली अनेक वर्षापासून विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. त्यापैकी गेल्या वर्षापासून आषाढी एकादशी निमित्त पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी २० हजार चिवडा पाकीट वाटपाचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

## शिवसेना वैद्यकिय मदत कक्ष व मेडिकल असो; तर्फे
# निवृत्तीनाथ महाराज पालखीतील वारकऱ्यांना औषधे वाटप



करमाळा(सं.प्र.) : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करमाळा शिवसेना, युवा सेना व महिला आघाडीच्या वतीने निवृत्तीनाथ महाराजांच्या पालखीतील वारकऱ्यांना औषध उपचार देण्यात आले. तसेच करमाळा तालुका मेडिकल असो; व शिवसेना वैद्यकिय मदत कक्ष यांचे वतीने जवळपास तीन हजार रूग्णांना औषधे देण्यात आली. यावेळी वारकऱ्यांना अन्नदान, करण्यात आले. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख महेश चिवटे, उपजिल्हाप्रमुख अनिल पाटील, तालुका प्रमुख राहुल कानगुडे, शहरप्रमुख संजय शिलवंत, युवा सेना तालुका अध्यक्ष नवनाथ गुंड, जेऊर युवा शहरप्रमुख माधव सुर्यवंशी, शिवसेना जेऊर शहरप्रमुख बाळासाहेब कर्चे, महिला आघाडी जिल्हा उपाध्यक्षा ज्योतीताई शिंदे, शेलगाव शाखाप्रमुख बनसोडे, जेऊर शाखाप्रमुख संजय जगताप, रंभापुरा शाखाप्रमुख केशव साळुंखे, हिवरवाडी शाखाप्रमुख आजिनाथ इरकर, मजी सरपंच राजेंद्र मेरगळ, उद्योजक मिलन जपे आदी मान्यवर उपस्थित होते.

सस्नेह निमंत्रण
॥ श्री गजानन प्रसन्न ॥ श्री कमलादेवी प्रसन्न ॥ जय जय रघुवीर प्रसन्न ॥
स.न.वि.वि.आमचे येथे श्रीहरी कृपेने..
वधू
चि.सौ.कां.रजनी B.Sc Agri.
स्व.नागनाथ देवराव जाधव यांची नात व श्री.रामदास नागनाथ जाधव रा.करमाळा यांची द्वितीय सुकन्या
वर
चि.विशाल B.E.
स्व.बाबासाहेब रामचंद्र सरडे यांचे नातू व श्री.बाळासाहेब बाबासाहेब सरडे रा.सोगाव(प) ता.करमाळा यांचे द्वि.चिरंजीव
यांचा शुभविवाह
रविवार, दि.१४/७/२०२४ रोजी दुपारी १२ वा. ३२ मि.
करण्याचे योजिले आहे. तरी वधू-वरास शुभाशिर्वाद देण्यासाठी सहकुटूंब सहपरिवार आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.. ही नम्र विनंती !
विवाहस्थळ
समर्थ मंगल कार्यालय
कुंभेज फाटा, ता.करमाळा., जि.सोलापूर.
आपले नम्र
श्री.गोरखनाथ नागनाथ जाधव
श्री.रामदास नागनाथ जाधव (मा.सदस्य, न.पा. शिक्षण मंडळ)
श्री.जालिंदर नागनाथ जाधव
समस्त जाधव परिवार, करमाळा.
टीप : सर्वांना निमंत्रण पत्रिका पाठविलेल्या आहेतच. नजरचुकीने कोणांस ही निमत्रण पत्रिका मिळाली नसल्यास हेच निमंत्रण समजून शुभकार्यास अगत्य येण्याचे करावे, ही नम्र विनंती !

साई स्टील रेलिंग & किचन ट्रॉलीज्
सर्व प्रकारचे स्टील रेलींग, मेनगेट किचन ट्रॉलीची सर्व कामे खात्रीशीर व वेळेवर करून मिळतील.
प्रोप्रा : प्रशांत जोशी मो.9881028191 / 7798304502
पत्ता : सय्यद कॉम्प्लेक्स, करमाळा-नगर रोड, बायपास, करमाळा.

## आधुनिकतेचा पाळणा.. कविता



पहिल्या दिवशी भरली शाळा
बाईंनी मुलींना केले हो गोळा
चला जावूया शिकण्या शाळा
नव्या शिक्षणाचा फुलवू मळा..
जो बाळा जोऽऽ रे जो ॥ १॥

नवीन शिक्षण धोरण आले
मुला-मुलींचे कल्याण झाले
प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले
शासनाला हे आता मान्य हो झाले..
जो बाळा जोऽऽ रे जो ॥ २॥

नका बाळगू तुम्ही मुलाची आशा
डोळ्यापुढे ठेवा पी.टी.उषा
पदकांची झाली सारी निराशा
मल्लेश्वरी ठरली भारताची आशा..
जो बाळा जोऽऽ रे जो ॥ ३ ॥

नारीचा जन्म ही भाग्याची खूण
दोन्ही कुळांचा होई सन्मान
कल्पना चावलाने चालविले यान
ठेवूया आपण तिचे स्मरण..
जो बाळा जोऽऽ रे जो ॥ ४॥

हूंडा देणे-घेणे कायद्याने गुन्हा
जावू नका त्याच्या वाटेला पुन्हा
प्रेमाने वागवा लेकी व सुना
हीच विनंती तुम्हा सर्वांना..
जो बाळा जोऽऽ रे जो ॥ ५॥

व्यसनापासून रहा मंडळी दूर
आयुष्य होते चकनाचूर
गुटखा-तंबाखूची करा हो होळी
सुखाने खा तुम्ही भाकरी पोळी..
जो बाळा जोऽऽ रे जो ॥६॥

सुनंदा बाईने पाळणा लिहिला
सुखी जीवनाचा मंत्र हो दिला
आयुष्य तुमचे येवो कामाला
हीच प्रार्थना राम रहिमाला..
जो बाळा जोऽऽ रे जो ॥ ७ ॥

**...सौ.सुनंदा सुरेश जाधव**
(मुख्याध्यापिका, नामसाधना प्राथ.विद्यामंदिर, न.पा.सेंट्रल स्कुल मुले नं.१ करमाळा)




# आता सात विहिरही संपेल..!

कधी कधी वाटतं की जग बदललं.., देश बदलला.., गावं बदलली.. पण करमाळा का बदललं नाही ? ३०-३५ वर्षापूर्वी मी पाहिलेलं करमाळा आजही तसंच आहे. तेच इथले धूळ भरलेले रस्ते, इथल्या तंग गल्ल्या, अरूंद गटारी, जागोजागी साचत चाललेली घाण, शब्दश: बकाल असणारे बसस्थानक आणि आता पडू लागलेली सात विहिर !

पूर्वी सात विहिर हेच करमाळ्यातील एकमेव सुंदर ठिकाण होते. तिथली उंच उंच झाडांची दाटी, त्यावर हजारोंच्या संख्येने बसणारे बगळे आणि इतर पक्षी, तिथली मनाला प्रसन्न करणारी शांतता आणि सात विहिरीचा गारवा. कितीतरी विद्यार्थी तिथल्या भल्या थोरल्या झाडाच्या बुंध्याला टेकून अभ्यास करताना मी पाहिलेत. ते ठिकाण कितीतरी रमणीय होते. तिथूनच करमाळा शहराला पाणी-पुरवठा व्हायचा. दिवसभर इलेक्ट्रिक मोटारीच्या आवाजाची घरघर तिथे सुरु असायची. विहिरीच्या दक्षिणेला तळ्याचा भराव आहे. त्यावर झाडांची दाटी होती. पलिकडे पश्चिमेला दूरवर फिरंग्याआईचा माळ दिसायचा.

मन कितीही उदास होऊ द्या, सात विहिरीसारखं नितळ निर्मळ ठिकाण होते. तिथेच त्या उदास मनाला प्रसन्नतेचा परिसर स्पर्श व्हायचा. तिथेच बसून कितीतरी विद्यार्थ्यांनी यशाला गवसणी घातली आहे. त्या विद्यार्थ्यांच्या यशाची मूक साक्षीदार म्हणजे ती विहिर आहे.

करमाळा शहराचे कितीतरी प्राचीन वैभव आहे ते... तेच वैभव आता हळूहळू नष्ट होत आहे याची खंत बाळगावी की लाज वाटू द्यावी याबाबत मनात संभ्रम आहे ! आज मी पाहतोय की त्या विहिरीच्या बांधकामाचे चिरे ढासळलेत.., आजुबाजूला चिलारीच्या झाडांची दाट बने झाली तिथे असणारी छानशी बाग आता नष्ट झाली आहे. तिथेही गवताचे रान माजले आहे. चिलार वेड्यासारखी झुंडीने तिथे वाढली आहे. सात विहिरीचं पूर्वीच सौंदर्य आता पूर्णपणे लयाला गेलेय. त्या परिसराला मरणकळा आली आहे. एखाद्या खानदानी गरती माता भगिणीला फाटक्या वस्त्रात पाहिल्यावर ज्या वेदना आपल्या मनाला होतील ना, त्याच वेदना कोणत्याही संवेदनशील व्यक्तीला तो परिसर पाहिल्यावर होतील हे नक्की !

मी इथे कोणत्याही नेत्याला पुढाऱ्याला तसेच अधिकाऱ्याला याबाबत जबाबदार धरणार नाही.. त्या सर्वांची याबाबत काही चूक नाही.. चूक आहे ती



आपली..या शहरात राहणाऱ्या नागरीकांची! कारण आपल्याला आता कोणत्याच गोष्टीचे देणे-घेणे उरले नाही.

आपण मोदीवर चर्चा करतो. अमेरिकेवर भरभरून बोलतो. साऱ्या जगाच्या उठाठेवी सोशल मिडीयातून करतो. पण आपल्याच गावातील संपत चाललेल्या ऐतिहासिक धरोहर बाबत मात्र आपण गप्प असतो, हा आपला दुतोंडीपणा आहे. म्हणून मी म्हटलं करमाळा बदललेलं नाही ! इथे राहणारे आपण षंढ आहोत.. या शब्दाबद्दल तुम्ही मला शिव्या दिल्या तरी चालतील, पण खरंच हा षंढपणा आता करमाळ्याच्या हाडामाशी भिनू लागला आहे. अरे इथल्या रोजच्या सोयी सुविधेबाबत तुम्ही बोलण्याची हिंमत करत नसाल तर सात विहिर तुमची कोण लागते ? आणि हा षंढपणा जर तुमच्यात असेलतर तुम्ही या साऱ्या गोष्टी डिझर्व करता याबाबत दुमत नसावे.

माझे पत्रकार बांधव आणि जे कोणी आजही आपला पुरूषार्थ टिकवून आहेत त्या सर्वांना आवाहन आहे की, परिसराला पुन्हा नव्याने सुंदर बनवण्यासाठी काही करता आले तर बघा.. तिथे कोणताही मलिदा नाही.. लाभ नाही.. आहे फक्त नितांत मनशांती आणि सुकून.. आपण एक ऐतिहासिक धरोहर वाचवली याचे मनापासूनचे समाधान !

तसे पाहिलेतर कुठे चार घटका निवांत बसावं असं ठिकाण स्मशान सोडलं तर बाकी करमाळ्यात दुसरं कोणतं आहे.. आपण ही सुंदर ठिकाणं बनवू शकतो, पण मनात घेतलं तर..! नाहीतर करमाळा हेपलून टाकलेल्या एखाद्या अनौरस अपत्यासारखं आजही तसंच राजकीय आणि सामाजिक-दृष्ट्या अडगळीत आहे हे मात्र तुम्हाला मान्यच करावे लागेल !

**...भीष्माचार्य चांदणे सर**
**(९८८११७४९८८)**

सा.कमलाभवानी संदेश वार्षिक वर्गणी २०० रु.

## नीट... कविता




कशी सुरू झाली रित
वशिल्यावर काढता येते नीट
अभ्यास न करणारे झाले धीट
बुध्दीमंताना आणला वीट...
पैशांचा वाढला जोर फार
जीवाशी आता खेळ होणार
माणसाने अक्कल होती विकली
आता तर बुध्दीही गहाण टाकली...
अरे मानसा जागा कधी होणार
डॉक्टर विना तुझा जीव जाणार
पैसे सगळे देवू शकत नाही
आपल्या हाती नाही काही...
हातचा एक त्याच्या हाती
त्यानेच ठरवल्यात बुध्दीच्या कुपी
ज्याची जागा त्याला द्यावी,
नाहीतर करावी लागेल भरपाई...
दर्जा ज्याचा त्यानेच ठरवावा
बुध्दी चालेल तिथेच जावा
हे युवका हो जागा,
तुझ्या हाती भारत माझा...
मोल ठरवावे आपणच आपले
काम कोणतेही नसते हलके
एक कौशल्य सगळ्यात असते
फक्त ते शोधायचे असते...
आपली जिथे नाही लायकी
जायचे का त्याच गावी ?
सिस्टममध्ये राहून ती बिघडवणारी,
आपलीच आहेत सारी मंडळी
बदलायचे का बिघडवायचे
तुम्हीच आता ठरवायचे...!

**...किर्ती पांडुरंग भापकर (जि.प.शाळा वरकटणे)**

## थोडं हसा..!



काल बायको म्हणाली..,
तुमच्यामुळे मला 'लाडकी बहिण योजना' मिळणार नाही.
मी म्हटलं.., 'का बरं ?'
ती म्हणाली.., 'तुम्ही टॅक्स भरता, तुमच्या नावावर चारचाकी गाडीची नोंद आहे.'
मी म्हटलं.., 'ठीक आहे !'
ती म्हटली.., 'ठीक कसलं, आता मला महिन्याला तुम्ही दीड हजार रूपये द्यायचे आहेत. विषय संपला.'
'आता लाडकी बायको' योजना लागू झाली.

---

पत्नी : 'अहो, एवढं निरखून काय पाहता आहात आपल्या मॅरेज सर्टिफिकेटमध्ये ?'
पती : 'एक्सपायरी डेट.'

---

मुलगा (आपल्या दुकानदार वडिलांना) : 'बाबा.. मला गणितात १०० पैकी ८० गुण मिळाले.'
दुकानदार (रागावून) : 'नालायक.. इथं मी रोज १०० ते १५० रूपये मिळवतो आणि तू चक्क २० रूपयांचा तोटा केलास !'

## फिसरे येथे भरदिवसा चोरी - दीड लाखाचा ऐवज लंपास

करमाळा(सं.प्र.) : फिसरे येथे भरदिवसा चोरी झाली असून, घराचा दरवाजा उघडून लोखंडी कपाटातील १ लाख ५१ हजार २५० रूपयाचे सोन्याचे दागिणे व रोख रक्कम चोरीला गेली आहे. हा प्रकार ५ जुलैला सकाळी ११ ते सायंकाळी ५ च्या दरम्यान घडला आहे. या प्रकरणी सुखदेव आजिनाथ दौंडे (रा.पोळ वस्ती, फिसरे) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की ५ जुलैला मी व माझी पत्नी घर बंद करून शेतात अकरा वाजता गेलो. त्यानंतर सायंकाळी पाच वाजता घरी आलो असता घराचा दरवाजा उघडा दिसला. त्यावेळी घरात जाऊन पाहणी केली असता बेडरूम मधील लोखंडी कपाट उघडून त्यातील १ तोळे वजनाचे सोन्याचे गंठन, ९ ग्रॅम वजनाची मण्याची माळ, दीड तोळा वजनाचे कानातील फुले व रोख ५ हजार रूपये असा १ लाख ५१ हजार २५० रूपयाचा ऐवज चोरट्यांनी चोरून नेला आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विनायक माहुरकर हे करत आहेत.

## साडे येथे ४३ हजार ८०० रूपयाची चोरी

करमाळा (सं.प्र.) : साडे येथे रात्री घरात घुसून घरातील रोख रक्कम ४३ हजार ८०० रूपये चोरट्यांनी चोरून नेली आहे. हा प्रकार ८ जुलैला पहाटे पावणेतीनच्या सुमारास घडला आहे. या प्रकरणी ज्योती मल्हारी काळे (पिग्मी एजंट, साडे) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की मी सुभाष पाटील पतसंस्थेत पिग्मी एजंट म्हणून काम करते. माझ्या घरी पिग्मीची रक्कम रू.४३ हजार ८०० एका पिशवीत ठेवलेली होती. तीन चोरट्यांनी घराचा कडीकोयंडा काढून घरात प्रवेश केला. रात्री पावणेतीन वाजता माझी मुलगी स्वराली ती झोपेतून उठली असता तिला तीन इसम घरामध्ये दिसले. तिने आवाज दिल्यावर ते तिघेजण पळून गेले. त्यावेळी घरातील सामान अस्ताव्यस्त पडलेले होते व पिशवीतील ४२ हजार ८०० रूपये चोरीला गेल्याचे लक्षात आले. यात पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे

## प्राण्यांना निर्दयपणे वागणूक देणाऱ्यावर गुन्हा दाखल - १४ खोंडाची मुक्तता

करमाळा (सं.प्र.) : छोट्याशा खोलीत १४ जर्सी गायीच्या खोडांना कोंबून बांधून ठेवून चारा पाण्याची सोय न करता निर्दयपणे वागणूक देणाऱ्या विरूध्द पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे. त्यातील १४ वासरांची सुटका करण्यात आली आहे. हा प्रकार ७ जुलैला रात्री साडेआठ वाजता घडला आहे. या प्रकरणी पोलीस हवालदार सोमनाथ महादेव जगताप यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की मौलालीमाळ येथे पत्र्याच्या शेडमध्ये १४ जर्सी गायीची लहान खोंडे निर्दयपणे बांधून चारा, पाणी व औषधाची सोय न करता कत्तल करण्यासाठी आणली होती. प्रत्यक्षात तेथे जाऊन पाहिले असता१४ खोडांना निर्दयपणे वागणूक दिल्याचे आढळून आले. ही खोंडे तौसिफ महंमद युसूफ कुरेशी (रा.कसाबगल्ली, करमाळा) यांनी आणली होती. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## महिलेचा विनयभंग - चौघांविरूध्द गुन्हा दाखल

करमाळा(सं.प्र.) : महिलेचा विनयभंग करून मिनी गंठन तोडून लाथा बुक्क्यांनी मारहाण केल्याप्रकरणी चौघां-विरूध्द करमाळा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणी ४२ वर्षाच्या महिलेने फिर्याद दिली आहे.

त्यात तिने म्हटले आहे, की ७ जुलैला दुपारी साडेबारा वाजता श्रीदेवीचामाळ येथे आमच्या जागेत पत्राशेडचे बांधकाम सुरू होते. तेथे देखरेख करण्यासाठी गेली असता, शहाजी ठोसर याने शिव्या देण्यास सुरूवात केली. त्यावेळी मी त्यांना शिव्या देऊ नका असे म्हणाले असता त्यांनी माझ्या अंगावर येऊन माझा विनयभंग केला व गळ्यातील मिनी गंठन हिसकावून घेतले. तसेच संकेत ठोसर याने माझा पण विनयभंग केला. तसेच पुजा माने व तिची मैत्रिण या दोघींनी मला लाथा बुक्क्यांनी मारहाण व शिवीगाळ केली आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## वाळू चोरी करणाऱ्या विरूध्द गुन्हा दाखल - ५ लाखाचा ऐवज जप्त

करमाळा(सं.प्र.) : वाळूची चोरी करणाऱ्या विरूध्द पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून ट्रॅक्टर, ट्रॉली व वाळू असा ५ लाख ६ हजार रूपयाचा ऐवज पोलीसांनी जप्त केला आहे. हा प्रकार ६ जुलैला रात्री पावणेबारा वाजता जातेगाव परिसरात घडला आहे.

या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल अनिल मोहन निकम यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की जातेगाव येथे वाळूची चोरी होत असल्याची माहिती समजल्यावर आम्ही रात्री दोन वाजता जातेगाव येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेवर थांबलो. त्यावेळी एक ट्रॅक्टर रात्री पावणेबारा वाजता येत असताना आम्ही तो आडवला. त्यावेळी ट्रॅक्टर चालकाने थांबवून अंधारात पळून गेला. त्या ट्रॉलीमध्ये १ ब्रास वाळू असल्याचे दिसून आले. सदरचा ट्रॅक्टर हा गौरव अंकुश बल्लाळ यांच्या मालकीचा असून त्याने शासनाची कोणतीही परवानगी न घेता बेकायदेशीरपणे वाळूची चोरी करत असल्याचे आढळून आले. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

## महिलेचा व्हीडिओ काढून जातीवाचक शिवीगाळ

करमाळा (सं.प्र.) : महिलेचा व्हीडिओ काढला असता, तो व्हीडिओ डिलीट कर असे म्हटल्यावर महिलेस जातीवाचक शिवीगाळ केल्या प्रकरणी एका विरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. हा प्रकार ७ जुलैला दुपारी एक ते दीडच्या सुमारास घडला आहे. या प्रकरणी ३० वर्षाच्या तरूणीने फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की ७ जुलैला मी व माझी मैत्रीण आमच्या घराच्या बाहेर असलेल्या बांधकामाच्या खडीवर बसलेली असताना महेश पाटील याने आमचे व्हीडिओ काढले. हे लक्षात आल्यानंतर आम्ही ते व्हीडिओ डिलीट कर असे म्हणालो असता आम्हाला जातीवाचक शिवीगाळ करून धमकी दिली आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपअधिक्षक अजित पाटील हे करत आहेत.


आरामदायक व सुखकर प्रवासासाठी एकच नांव...




**जय बजरंगबली टूर्स & ट्रॅव्हल्स्, पोंधवडी**
ता.करमाळा, जि.सोलापूर



खास श्रावणमासनिमित्त
**काशी दर्शन यात्रा**
काशी, गया, अयोध्या, प्रयाग
कालावधी : दि.५/८ ते १३/८/२०२४
सहल खर्च : रू.१५,१००
(रेल्वे प्रवास ३ एसी)

खास श्रावणमासनिमित्त
**कन्याकुमारी दर्शन**
कन्याकुमारी, त्रिवेंद्रम, मदुराई, रामेश्वरम् तिरूपती बालाजी
कालावधी : दि.२१/८ ते ३०/८/२०२४
सहल खर्च : रू.१३,८००

**चारधाम दर्शन**
यमुनोत्री, गंगोत्री, केदारनाथ, बद्रीनाथ हरिद्वार, ऋषीकेश
कालावधी : दि.१३/१० ते २७/१०/२०२४
सहल खर्च : रू.३३,०००
(रेल्वे प्रवास ३ एसी)

**केरळ दर्शन**
कोचीन, अलेप्पी, थेकड्डी, मुन्नार त्रिवेंद्रम, कन्याकुमारी
कालावधी : दि.४/११ ते १४/११/२०२४
सहल खर्च : रू.२८,०००
(रेल्वे प्रवास ३ एसी)

**राजस्थान दर्शन**
जयपुर, पुष्कर, बिकानेर, जेसलमेर जोधपूर, उदयपूर, चित्तोडगड
कालावधी : दि.१७/११ ते २८/११/२०२४
सहल खर्च : रू.२४,५००

**नेपाळ दर्शन**
वाराणसी, गोरखपूर, पोखरा, मनोकामना काठमांड, लुंबिनी, अयोध्या, प्रयागराज
कालावधी : दि.१/१२ ते १४/१२/२०२४
सहल खर्च : रू.२५,०००
(रेल्वे प्रवास ३ एसी)

**गुजरात दर्शन**
स्टॅच्यू ऑफ युनिटी, अक्षरधाम, गिरनार पर्वत, जुनागड, सोरटी सोमनाथ नागेश्वर ज्योर्तिलिंग, द्वारकाधाम
कालावधी : दि.१६/१२ ते २४/१२/२०२४
सहल खर्च : रू.१४,०००

- रेल्वे प्रवास • बस प्रवास
- भोजन व्यवस्था
- राहण्याची उत्तम सोय

**बुकींग सुरू**
नावनोंदणीसाठी त्वरीत संपर्क साधावा !

**संपर्क : श्री.मयुर राऊत (८८८८३३३६३८, ९६८९४८८५८५)**

## पुरवणी अर्थसंकल्पात करमाळा मतदार संघातील
# प्रशासकीय संकुल बांधकामासाठी ३७ कोटी निधी मंजूर : आ.शिंदे



करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरातील पंचायत समिती, तहसील कार्यालय, भुमी अभिलेख कार्यालय, पोलीस स्टेशन इ. सर्वच प्रशासकीय इमारती जीर्ण झाल्या आहेत. प्रशासकीय कामकाजासाठी नवीन प्रशासकीय इमारतीची गरज ओळखून आपण तत्कालीन महाविकास आघाडी सरकारकडे प्रशासकीय संकुल बांधकामासाठी ३५ कोटी निधीची मागणी केली होती. ती मागणी आता महायुतीच्या कार्यकाळात मंजूर झाली आहे. करमाळा शहरातील प्रशासकीय संकुलासाठी ३४.६८ कोटी तर कुर्डूवाडी शहरातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयासाठी १.७७ कोटी असा एकूण ३७ कोटी निधी मंजूर झाला आहे; अशी माहिती आमदार संजयमामा शिंदे यांनी दिली.

याविषयी अधिक माहिती देताना आ.शिंदे म्हणाले, की राज्य विधीमंडळाचे अधिवेशन सध्या सुरू असून, या अधिवेशनामध्ये करमाळा तालुक्याच्या हिताच्या महत्वाच्या बाबी पूर्णत्वास जात आहेत, याचे समाधान आहे. अधिवेशन कार्यकाळामध्ये कुकडी, उजनी उपसासिंन योजनेच्या सर्वेक्षणासाठी निधी मंजुरीचे निर्देश देण्यात आले. त्याचबरोबर दहिगाव योजनेतील शिल्लक पाण्यात इतर गावे समाविष्ट करण्यासाठी सर्वेक्षणाचे आदेश या कामांबरोबरच इमारत बांधकामासाठी भरीव निधी मिळाल्यामुळे करमाळा शहराच्या वैभवात भर पडणार आहे. या बजेटमध्ये राज्य मार्ग, प्रमुख जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग यासाठीही मोठ्या प्रमाणावरती निधी लवकरच उपलब्ध होणार असल्याचेही आमदार शिंदे यांनी सांगितले.

# मदारी समाजातील जन्माची नोंद सरकारी दप्तरी करण्याची मागणी

करमाळा(सं.प्र.) :करमाळा येथील मदारी समाजातील जन्माची नोंद सरकारी दप्तरी करावी; अशी मागणी मदारी समाज मुस्लिम विकास मंडळा तर्फे करण्यात आली आहे. याबाबत मदारी समाज मुस्लिम विकास मंडळाने तहसीलदार यांना निवेदन दिले आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की मौलालीमाळ येथे मदारी समाजाचे जवळपास ४३ कुटूंबे राहत आहेत. परंतु त्यांच्या कुटूंबातील सदस्यांची जन्माची नोंद सरकारी दप्तरी झालेली नाही. त्यामुळे शिक्षण, नोकरी, व्यवसाय, बँक कर्ज इ. कामासाठी या नोंदीची गरज आहे. जन्माची नोंद नसल्यामुळे अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. शासनाने तात्काळ सर्व्हे करून मदारी समाजाच्या नागरीकांची जन्माची नोंद करावी; अशी मागणी या समाजाचे अध्यक्ष समशेर वुडन मदारी यांचेसह ४३ समाजबांधवांनी केली आहे.




इंदापूर(जि.पुणे) येथील सुप्रसिध्द
**त्वचारोग, गुप्तरोग तज्ञ**
**डॉ.महेश तानाजी रुपनवर**
MBBS. DDV(Bombay)
वेळ :सकाळी १० ते ११.३०

**Facilities...**
- गुप्तरोग उपचार व सल्ला
- Ance(pimples) Treatment
- Ance Scar Treatment
- Melasma • Hair Loss
- Hyper Pigment Treatment
- Skin Whitening
- Under Eye Dark Circles
- Skin Tag, Wart Removel
- Dandruff Treatment
- Tatto Removel by Laser
- Fangal infection, Leprosy Psriasis, Eczema
- Unwanted Hair Removel by Laser
- Skin Glow, Polishing Skin Rejuvenation
- Anti Aging • Medicated Facial



महिन्यातील दुसऱ्या व चौथ्या शनिवारी
**घोलप हॉस्पिटल**
करमाळा, जि.सोलापूर येथे उपलब्ध !

**नावनोंदणीसाठी संपर्क : मो.8483822200/9421062073**

# मोटारसायकल चोरास पकडण्यात पोलीसांना यश

करमाळा(सं.प्र.) : करमाळा तालुका हद्दीत एका मोटारसायकल चोराला पकडण्यात पोलीसांना यश आले आहे. सदरचा संशयित हा मोटारसायकल घेऊन जात असताना गस्त घालत असलेल्या पोलीस कर्मचारी ज्ञानेश्वर घोंगडे व पोलीस नाईक ठेंगल यांनी ही कारवाई साडे परिसरात केली.यात हकीकत अशी की, ९ जुलै रोजी पोलीस कर्मचारी ज्ञानेश्वर घोंगडे व पोलीस नाईक ठेंगल हे करमाळा पोलीस ठाणे हद्दीतील साडे येथे गस्त घालत होते. यावेळी रस्त्यावरून एक बिगर नंबरची मोटारसायकल त्यांना आढळली. त्यावेळी त्यांनी संबंधिताकडे चौकशी केली. त्यावेळी त्याने टाळाटाळ करण्यास सुरूवात केली. यावरून त्याच्यावरील संशय बळावला. त्याला विश्वासात घेऊन त्याचे नाव विचारले तर त्याने अंकुश साहेबराव काळे (वय-३०, रा.डोमगाव, ता.परांडे) असे सांगितले. नंतर त्याच्याकडे सदर मोटारसायकलचे कागदपत्रा बाबत विचार केली तर त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यामुळे मोटारसायकल चोरीची असल्याचा संशय पोलीसांना आला. त्यावरून त्यास अटक करीत त्याच्याकडून बिगरनंबरची हिरोहोंडा प्लस ही गाडी ताब्यात घेण्यात आली

# सरस्वती करे यांचे निधन



करमाळा(सं.प्र.) : विहाळ येथील सरस्वती नवनाथ करे (वय-६७) यांचे अल्पशा आजाराने ७ जुलै रोजी पहाटे निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुले, एक मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. सरस्वती करे यांना सर्वजण सरसा उर्फ काकू या नावाने ओळखतात. लहानपणापासूनच त्यांना अध्यात्माची आवड होती. स्नेहशील व मनमिळावू स्वभावामुळे त्यांनी सर्वांची मने जिंकली होती. बालपणीच मातृछत्र हरपलेल्या सरस्वती करे यांच्या वाट्याला आयुष्यभर संघर्षच आला; परंतु त्यांनी हार न मानता काबाडकष्टाने आपला संसार उभा केला. त्यासाठी वेठबिगारीसह शेतातील कामे करत त्यांनी कपडे शिवण्याची कलाही आत्मसात केली होती. कालांतराने पिठाची गिरणीही चालवू लागल्या. मुलांच्या शिक्षणासाठी त्यांनी अहोरात्र मेहनत घेतली. ज्येष्ठ पत्रकार योगिराज करे, पोलीस कर्मचारी किरण करे व अंगणवाडी सेविका सविता देवकते यांच्या त्या मातुश्री होत. त्यांचे अंत्यविधी प्रसंगी सर्व स्तरातील नागरीक उपस्थित होते.

**जागा विकणे आहे**
करमाळा शहरातील मेनरोड वरील २० x ६०
(१२५० स्क्वे.फुट) तीनही बाजुने फेसिंग असलेली जागा
योग्य किंमत आल्यास त्वरीत विकणे आहे.
**संपर्क : मो.7722007010, 8329861483**


**आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर**



रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर
अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
- सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरूस्तीचे ठिकाण



कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.



मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)

दर महिन्याचा तिसरा रविवारी शिबीर वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत

Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते

**श्री कमलादेवी ऑप्टीकल्स** नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक फिसरेकर मो.९४२३५३५४४२

आशिर्वाद



स्व.डॉ.रतनलाल माणिकचंद शहा-जवळेकर

# शहा हॉस्पिटल (जवळेकर)

मेनरोड, करमाळा.,जि.सोलापूर

नवीन रुपात.., नवीन जागेत.., नुकतेच स्थलांतरीत झालेल्या 'शहा हॉस्पिटल' च्या पुढील यशस्वी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा !

## उपलब्ध सुविधा

- डी.आर.डिजीटल एक्स-रे
- अल्ट्रा सोनोग्राफी
- कॉम्प्युटराईज्ड लॅबोरेटरी
- सरकारमान्य कुटूंब नियोजन व गर्भपात केंद्र
- सुसज्ज ऑपरेशन थिएटर
- अतिदक्षता विभाग
- हायस्पीड स्पायरल सिटीस्कॅन इन कॅम्पस्
- कलर डॉपलर
- ई.सी.जी.
- सर्जीकल होम
- फिजिओथेरपी
- सी-आर्म
- गॅस्ट्रोस्कोपी



I.C.U. | Multislice CT Scan | Gastroscope | DR Digital X-Ray | C-Arm
Pathology | E.C.G. | Pulse Oxymeter | Colour Doppler Sonography | Ventilator



डॉ.राजेश आर. शहा
एम.बी.बी.एस., डी.सी.एच. (बालरोग तज्ञ)



डॉ.संदेश आर. शहा
एम.एस.(जनरल सर्जन)




शुभेच्छुक
**स्वस्तिक मेडिकल & जनरल स्टोअर्स**
मेनरोड, करमाळा (प्रोप्रा : अतिश(दादा) रविंद्रकुमार दोशी मो.९८५०२८७००८)
स्वस्तिक मेडिकल फॅमिली आणि सर्व स्टाफ



FIT INDIA

Reg No : F-31904

# ईशा पॅरामेडिकल अ‍ॅन्ड एज्युकेशनल इन्स्टिट्यूट, करमाळा.

Affiliated By :- Engineering & Management Institute of India Under the Department of Higher Education Ministry Of Education Gov. of India (MHRD code : S-21363)

## इंजिनिअरींग व टेक्नीकल

क्षेत्रात करिअर घडविण्याची सुवर्णसंधी !

**Eligibility for Technical Courses**

Duration : 3 years (6 Semester),
Qualification : 10th or Eq.

Duration : Lateral Entry 2 yrs. (4 Semester)
Qualification : 12th PCM / ITI

**ADMISSION OPEN**



- Diploma in Civil Engineering
- Diploma in Computer Eng.
- Diploma in Electrical Eng.
- Diploma in Computer Science
- IT & Management

## आरोग्य क्षेत्रात

करिअर घडविण्याची सुवर्णसंधी !

ADMISSION OPEN

Affiliated By :- Lal Bahadur Shastri Paramedical Council Under the Department of Higher Education Ministry Of Education Gov. of India (MHRD code : S-21267)



Eligibility For Paramedical Courses
Qualification : 12th Science

- Optometry
- D.M.L.T.
- Diploma in Sanitary Inspector
- Diploma in X-ray Technician
- Diploma in Dialysis Technician
- All Paramedical Course Available

कॉलेजची खास वैशिष्ट्ये : • सुसज्ज इमारत • तज्ञ शिक्षक वृंद • प्रॅक्टीकलसाठी लॅब • १००% जॉब प्लेसमेंट

- शिष्यवृत्ती योजना उपलब्ध
- लिमिटेड सीट तरी आजच आपला प्रवेश निश्चित करा !

पत्ता : सोलंकर बिल्डींग, नगर रोड, बायपास, मॉडर्न जिम, २ रा मजला, करमाळा (९९७०९३०१५३, ९७३००३३१२४)